# महाराष्ट्र शासन

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 IN: U85300PN2019NPL187405 **ई मेल -** mahajyotingp@gmail.com


जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/3076/2024-25 **दिनांक :-** 29/10/2024

प्रति,

1. रिलाएबल स्पर्धा परीक्षा केंद्र,छ.संभाजीनगर.
2. भगिरथ स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे.
3. संबोधी अकॅडमी पुणे.
4. एच व्ही देसाई अकॅडमी पुणे.

**विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क परीक्षा पुर्व प्रशिक्षण 2024-25 करीता प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्रात रुजू करुन घेण्याबाबत प्रशिक्षण संस्थांना सूचना.**

**संदर्भ :- प्रशिक्षण संस्थेत रूजू झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेमार्फत प्राप्त अहवाल.**

महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2024-25 करिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संस्थानिहाय यादी दि.11/10/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दि.15/10/2024 रोजी पर्यंत प्रशिक्षण केंद्रात रूजू होण्याकरिता कळविण्यात आले होते. दि.11/10/2024 रोजी सदर प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी देखील प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच निवड यादीतील जे विद्यार्थी रूजू झालेले नव्हते, त्या ऐवजी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना दि.25/10/2024 रोजी पर्यंत रुजू होण्याकरीता संधी देण्यात आली होती. परंतु आतापर्यंत प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीनुसार वरील संदर्भान्वये प्रशिक्षण संस्थांकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सद्यस्थितीत प्रशिक्षण संस्थेत रिक्त असलेल्या जागांकरिता संवर्गनिहाय संख्येचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | टक्केवारी | भरावयाच्या जागा (रिक्त असलेल्या जागा) |
|---|---|---|---|
| 1 | NT-B | खुला प्रवर्ग 70% | 4 |
| | | महिला प्रवर्ग 30% | 4 |
| 2 | NT-C | खुला प्रवर्ग 70% | 12 |
| | | महिला प्रवर्ग 30% | 5 |
| 3 | NT-D | खुला प्रवर्ग 70% | 6 |
| | | महिला प्रवर्ग 30% | 2 |
| 4 | OBC | खुला प्रवर्ग 70% | 53 |
| | | महिला प्रवर्ग 30% | 14 |
| 5 | SBC | खुला प्रवर्ग 70% | 6 |
| | | महिला प्रवर्ग 30% | 4 |
| 6 | VJ | खुला प्रवर्ग 70% | 6 |
| | | महिला प्रवर्ग 30% | 3 |
| एकूण- | | - | 119 |

रिक्त असलेल्या जागी यापुर्वीच प्रसिद्ध केलेल्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबतची कार्यवाही आपल्या संस्थेद्वारे करण्यात यावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. प्रवेश द्यावयाच्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची यादी यांसह संलग्न करण्यात येत आहे.

संबंधित विद्यार्थ्यांना रुजू होण्याकरीता दि.05/11/2024 रोजी पर्यंत मुदत देण्यात यावी. या मुदतीस संबंधित विद्यार्थी रुजू न झाल्यास या कार्यालयास न चुकता कळवावे.

**सहपत्र:- विद्यार्थ्यांची यादी**.

(स्वा.)
(विकास गडपायले)
**प्रकल्प व्यवस्थापक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर